वाचा::1. श्री सु.वि.कोळेकर, उपसचिव,महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रंमाक-टंचाई/प्र.क्र.79/पापु-14 दिनांक-6 मे 2010 व दिनांक-13 मे 2010

2. श्री सु.वि.कोळेकर, उपसचिव,महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रंमाक-टंचाई/प्र.क्र.79/पापु-14 दिनांक-13 मे 2010

जा.क्र.2010/पा.टं./2245/निधी/कावी-4495
जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक-13/07/2010

विषय:-ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारक उपाययोजनांसाठी अनुदान आर्थीक वर्षे 2010-2011 मागणी क्रं.सि-6-2245 आपत्तीच्या निवारणासाठी निधी वितरीत करणे बाबत

**::आदेश::**

1. वरील विषयी संदर्भीय शासन निर्णयानुसार मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांनी हिंगोली जिल्हयातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतुन सन 2010-2011 ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ राबविलेल्या उपाययोजना वरील देय खर्च भागविण्यासाठी हिंगोली जिल्हयास 1,25,00,000/- अक्षरी एक कोटी पंचवीस लक्ष फक्त निधी प्राप्त झाला आहे.
2. उपलब्ध अनुदानातुन वर नमुद केलेल्या उपायोजनावरील सन 2010-2011 मधील खर्च भागविण्यासाठी जिल्हाधिकारी हिंगोली यांना प्राप्त झालेला निधी 1,25,00,000/- अक्षरी एक कोटी पंचविस लक्ष निधी मी जिल्हाधिकारी हिंगोली या आदेशाव्दारे अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे खाली दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांना खालील अटीच्या अधिन राहुन त्यांच्या मागणी प्रमाणे सुपुर्द करीत आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | यापुर्वी वितरीत करण्यात आलेला निधी | या आदेशान्वये मंजुर केलेला निधी | एकुण मंजुर केलेला निधी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली | निरंक | 1,25,00,000/- | 1,25,00,000/- |

3. टंचाई कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या सर्व उपाययोजनावरील प्रत्यक्षात झालेला खर्च व उपलब्ध करुन दिलेला निधी यांचा समतोल साधुन अनुदानाचे वाटप करावे. केवळ टंचाईच्या एखादयाच उपाययोजनेवर खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.
4. उपलब्ध करुन दिलेला निधी तात्काळ खर्ची टाकण्याबाबत कार्यवाही करावी व निधी वितरीत करते वेळेस प्रत्येक कामाचे मुळ प्रपत्र ब घेतल्याशिवाय टंचाई कृति आराखडयात सदरील कामाचा समावेश असल्याशिवाय निधी वितरीत करण्यात येवु नये उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाची उपयोगीता प्रमाणपत्रे तात्काळ या कार्यालयास सादर करावी.
5. कोषागारातुन काढलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत अखर्चित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. व रक्कम अखर्चीत राहत असल्यास तात्काळ शासनास व त्या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी. तसे न झाल्यास होणा-या आर्थीक अनियमिततेसाठी आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

6. सदर खर्च मागणी क्रंमाक सि-6 लेखाशिर्ष-2245 नैसर्गीक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य -01 अवर्षण-102 पिण्याच्या पाण्याचा पुरवठा-102 (00) (01) निकडीच्या पाणी पुरवठा योजना (22450093) (दत्तमत) (योजनेत्तर) या लेखाशिर्षाखील चालु वित्तीय वर्षात (सन 2010-2011 ) खर्च म्हणुन दर्शविण्यात यावा.
7. नियंत्रक अधिका-यांचे लक्ष शासन परित्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-1083/140/अर्थसंकल्प-3 दि.26 एप्रिल 1986व ज्ञापन परिपत्रक क्र.सीएएनएफ-1086/153/अर्थसंकल्प 3 दि.28 ऑगष्ट आकस्मिकता निधी मंजुर केलेला वित्त विभागाकडील शासन ज्ञापन क्र.आकनि-11.09/23/अर्थसंकल्प 6 (आकस्मिकता निधी सकेतांक-8007 4753) दिंनाक 25 ऑगष्ट् 2009 विलावर लाल शाईने लिहावा व ती लाल शाईने अधोरेखीत करावा.
8. कोणत्याही परिस्थितीत मंजुर अग्रीम निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही व हा खर्च तात्काळ खर्च करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.
9. आहरण व सवितरण अधिका-यांनी कोषागार/उपकोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणा-या व बिलासोबत जोडल्या जाणा-या कॉम्प्युटर स्लीपमध्ये गौण/उपलेखाशिर्षाचा संगणकयंत्र संकेताकाचा न चुकता उल्लेख करावा. तसेच दरमहा होणा-या खर्चाचे पत्रक व उपयोगीता प्रमाणपत्र 31 तारखेपर्यत पाठविण्यावा यावी.

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी हिंगोली

प्रतिलीपी,

1. मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर.
2. मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. महालेखाकार,महाराष्ट्र शासन नागपुर यांना माहितीस्तव सादर.
4. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.
5. जिल्हा कोषागार अधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव.
6. कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.हिंगोली यांना देवुन कळविण्यात येते की, मंजुर रक्कमेतुन कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. बांधकाम विभाग परभणी यांना रुपये 29,90,700/- धनाकर्षाव्दारे वितरीत करण्यात यावा.
7. कार्यकारी अभियंता,म.जि.प्रा.बांधकाम विभाग परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, आपण मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली यांचेकडुन निधी हस्तगत करावा.
8. उपअभियंता,म.जि.प्रा.बांधकाम हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
9. एन आय सी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना माहितीस्तव.

स्थळप्रतिवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी हिंगोली करीता